महाराष्ट्र शासन
वन विभाग
वन संरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय
'वनभवन' उस्मानपुरा, स्टेशन रोड, छ.संभाजीनगर- ४३१ ००५
दूरध्वनी क्र. :- (०२४०) २३४५५०८
ई-मेल:- ccftabad@mahaforest.gov.in Website: www.mahaforest.gov.in

क्रमांक-कक्ष-२(१)/आस्था-अराप/प्र.क्र.२३ (२२-२३)/931/२५-२६, दिनांक- 25 / ०६ /२०२६

**आदेश**

**विषय:**- वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नती देणे बाबत.

**संदर्भ:-१)** विभागीय निवड समितीची बैठक दिनांक २३/०२/२०२६
२) नागरी सेवा मंडळाची दिनांक २५/०६/२०२६ रोजीची बैठक.

छत्रपती संभाजीनगर वनवृत्तातील वनरक्षकांना वनपाल पदी पदोन्नती देण्याचे अनुषंगाने विभागीय पदोन्नती समितीच्या दिनांक २३/०२/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार निवडसूची तयार करणेत आली. त्यानुसार पात्र ठरलेल्या खालील वनरक्षकांची शासन निर्णय दि.०५/०७/२०२१ मधील तरतूदीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून, नागरी सेवा मंडळ-२ ने दिनांक २५/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार, तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती नंतरची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करणेत येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव (सर्व श्री) | कार्यरतविभाग | पदोन्नती चा प्रवर्ग | नागरी सेवा मंडळाने केलेली शिफारस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्नतीचे पद | पदोन्नती नंतरची पदस्थापना |
| १ | शिरुरे पांडूरंग नारायन | नांदेड वनविभाग | खुला | वनपाल | वनपाल अ.नि.व सं नांदेड वनपरिक्षेत्र नांदेड वनविभाग नांदेड |
| २ | मिरा जगदीश गायकवाड | नांदेड वनविभाग | खुला | वनपाल | वनपाल मांडवा वनपरिक्षेत्र माहूर (प्रा) वनविभाग नांदेड |
| ३ | महेश अनंतराव कुलकर्णी | हिंगोली वनविभाग | खुला | वनपाल | वनपाल तेंदू हिंगोली वनपरिक्षेत्र (प्रा) हिंगोली वनविभाग हिंगोली |
| ४ | हरेराम गंगाराम उप्पलवाड | मुल्यांकन विभाग छ.संभाजीनगर | खुला | वनपाल | वनपाल सावप गगांखेड साववि परभणी |

२. उपरोक्त नमुद वनरक्षक (गट-क) यांना खालील अटींच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात वनपाल पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

i) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ स्थित सेवाजेष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या

स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ नुसार दिलेल्या सुचनांनुसार सदर मान्यता देण्यात आली आहे. सदर पदोन्नती ही तात्पुरती असून, संबंधितांना देण्यात येणारी पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालय /मा.उच्च न्यायालय येथे याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास सदर प्रलंबीत याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहतील.

ii) वनपाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती संबंधितांना बंधनकारक राहील.

iii) सदरहू आदेश महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई /नागपूर /छत्रपती संभाजीनगर खंडपीठ तसेच मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय इत्यादी ठिकाणी वनरक्षक संवर्गातून अथवा वनपाल संवर्गातून जेष्ठतेच्या संबंधातील दावे/याचिका दाखल केल्या /झाल्या असल्यास सदर याचिकाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहतील.

iv) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन), नियमावली २०२१ मधील नियम २ (ड) मधील तरतुदीनुसार, पदोन्नतीने नियुक्ती होणा-या सदर कर्मचा-यांना पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून विहित मुदतीमध्ये रुजू होणे आवश्यक राहील,

v) निवड सुचीतील ज्या कर्मचा-यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु असेल त्यांच्या बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १५/१२/२०१७ व दि.३०/८/२०१८ मधील तरतुदीनुसार विभागाने कार्यवाही करावी.

३. सदर पदोन्नत कर्मचा-यांना कळविण्यात येत की, त्यांनी पदोन्नतीचे/नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यमुक्त केल्यानंतर विहित मुदतीत ते नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, अथवा पदोन्नती नाकारल्या तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरुन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १२.०९.२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार या कार्यालयाचे स्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच पदोन्नती नाकारणा-या कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वनपाल पदाचा १२/२४ अथवा १०, २० व ३० वर्षाचा लाभ दिला असल्यास तो तात्काळ थांबविण्यात येईल व पूढील २ वर्षी होणा-या पदोन्नतीच्या निवडसुचीमध्ये संबधीत वनपाल यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्रक्र३०३/का.१२ दिनांक १२/०९/२०१६ अन्वये पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम व त्या बाबत अवलंबविण्याची कार्यवाही या बाबत स्पष्टता केली आहे.

४. पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना वनपाल या पदाचा कार्यभार ग्रहण केल्यावर वेतन निश्चितीचा विकल्प तात्काळ द्यावा, असा विकल्प न दिल्यास, त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमावली १९८१ मधील नियम क्र. ११(१) (ए) नुसार पदोन्नतीच्या दिनांक विचारात घेऊन करण्यात येईल.

५. वरील पदोन्नत कर्मचारी हे पदोन्नतीचे पदावर हजर झाले नाहीत अगर त्यांनी पदोन्नती नाकारली तर त्यांना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन-१००९/प्रक्र४४/सेवा-३ दिनांक १/०४/२०१० नुसार देण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ तात्काळ काढून घेण्यात येईल.

६. संबंधित कर्मचारी यांनी पदस्थापनेबाबत कोणताही बाह्य दबाव आणल्यास किंवा कोणाही मार्फत दुरध्वनीद्वारे पदस्थापनेमध्ये बदल करण्यासाठी दबाव आणल्यास त्यांना पदोन्नतीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन त्यांचे पदोन्नतीचे आदेश तात्काळ रद्द करण्यात येईल, यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. त्याच प्रमाणे संबंधित नियंत्रक अधिका-यांनी पदोन्नत कर्मचा-यांना तात्काळ कार्यमुक्त करावे, तसेच संबंधीताचा कार्यमुक्त/रुजू बाबतचा अहवाल यथाशिघ्र सादर करावा. तसेच सदर आदेशाची प्रत पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांना उपलब्ध करुन द्यावी.

(प्रमोद चंद लाकरा)
वनसंरक्षक
(प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर

प्रति,
वरीलप्रमाणे संबंधितास
(मार्फत:- संबंधित नियत्रंक अधिकारी)

प्रतिलिपी:-मा.अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (प्र.दु.सं.),म.रा.नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी : माहिती व उचित कार्यवाहीस्तव**

१) वन सरंक्षक, सामाजिक वनीकरण, छ.संभाजीनगर
२) उप वन संरक्षक छ.संभाजीनगर/नांदेड वन विभाग
३) विभागीय वन अधिकारी प्रा. हिंगोली
४) विभागीय वन अधिकारी, (सा.व.), परभणी
५) विभागीय वन अधिकारी (मुल्यांकन), छ.संभाजीनगर

(प्रमोद चंद लाकरा)
वनसंरक्षक
(प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर